# श्री. जगन्नाथ लक्ष्मणराव सोनकुसरे

सेवक क्र. १२९

मु. गणेशपेठ, नागपूर

तत्त्वावर येण्यापुर्वी आम्ही अनेक देवांना मानत होतो. आमच्या घरी देवस्थान होते. देवस्थानात सीता, हनुमान, शंकर आणि श्रीकृष्ण यांच्या मूर्त्या होत्या. वडीलांच्या अंगात हनुमानजी येत होते. तरीपण आम्ही दुःखीच होतो. आमच्या सावत्र आईखी चार मुले मरण पावली. मूल ४-५ महिन्यांचे झाले की ते पायरीहून खाली पडायचे आणि त्यातच ते दुःखी होऊन दगावत असे. अशाप्रकारे १० ते १२ वर्षात चारही मुले मरण पावली. आम्ही घरी पूजत असलेल्या अनेक देवतांना विनंती केली. नवस करुनही काहीच फायदा झाला नाही. आम्ही पैशाने फार त्रस्त झालो. आम्हाला कोणताच आधार राहिलेला नव्हता. काही दिवसांनी माझे लग्न झाले. आम्ही फार दुःखी राहू लागलो. एके दिवशी माझी पत्नी आजारी पडली. काही दिवस गेल्यावर ती मरणाच्या मार्गाला लागली. प्रयत्न करुनही सुधारली नाहीच पण आणखी जास्त आजारी पडली. अशाप्रकारे आमच्या कुटुंबात दुःख येत होते. आम्ही भयभीत झालो. एके दिवशी मी सासऱ्यांकडे गेलो असता माझ्यासमोर एक प्रसंग घडला. माझे सासरे श्रीमान शंकरराव धार्मिक हे यादवराव महाराजांचे शिष्य होते. त्यांची मुलगी आजारी होती. तिला भूत झोंबले होते. त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले पण आराम पडत नव्हता. त्यांना कोणीतरी सांगितले की, बाबा हनुमानजींच्या मार्गावर जो सेवक आहे त्याला बोलवावे म्हणजे दुःख दूर होते. त्याप्रमाणे मार्गातील एका सेवकाला बोलविल्यानंतर त्यांनी तीर्थ करुन दिले. त्यानंतर त्यांनी मार्गाविषयी रुपरेषा सांगितली. मी हे सर्व प्रत्यक्ष पाहिल्यामुळे मी या मार्गाकडे आकर्षित झालों. नंतर त्यांच्यासोबत मी नेहमी महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे जाऊ लागलो. माझे मन नेहमी अस्वस्थ व दुःखी असे. माझा आणि बाबांचा काहीच परिखय नव्हता. आमच्याकडे दहा वर्षापासून संतती नव्हती. सत्संगामुळे लाभ होतो असे म्हणतात. त्याची प्रचिती मला आली. संततीचा योग आला व मुलगा जन्माला आला. तेव्हा मी त्या मार्गावर नव्हतो. मुलगा चार दिवसांचा झाला व दवाखान्यातच हिरवा कंच पडला व त्याने चिमणीसारखे तोंड फाडून दिले. मला ह्याबद्दल काहीच माहिती नव्हती. माझी आत्याव वडील डबा घेऊन दवाखान्यात जात होते. मी बाहेरुन परत आलो. तेव्हा रात्रीचे ९.३० वाजले होते. मी आत्याला दवाखान्यात जाण्याकरिता रिक्षा करुन

दिली. तेव्हा रिक्षावाल्याने मला म्हटले, 'भैया आप भी बैठ जाओ' । मी म्हणालो, मैने अभी तक खाना नही खाया इसलिये मै नही बैठता । तेव्हा रिक्षावाल्याने मला रिक्षात बसण्याचा आग्रह धरला व म्हणाला , 'आप पैसे मत देना' वैसेही बैठो । तेव्हा त्याच्या आग्रहावरुन मी रिक्षात बसलो. दवाखान्यात गेल्यावर पाहतो तर, मुलाच्या आईने मुलाला धरले आहे व मुलाने तोंड फाडले आहे. अशा परिस्थितीत मी रात्री ११ वाजता घरी परत आलो. वडीलांशी मुलाबद्दल चर्चा केली. त्यांना म्हटले की आजपासून तुमच्या कोणत्याही देवतांना मानणार नाही. तेव्हा तसाच मी रात्री ११.३० वाजता महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे गेलो. बाबांना मुलाच्या प्रकृतीबद्दल माहिती दिली व बाबांना दवाखान्यात चलण्याबद्दल विनंती केली, तेव्हा बाबांनी सांगितले की तुम्ही भगवंताला विनंती करा आणि एक सेवक सोबत घेऊन दवाखान्यात जा. त्यावेळेस मला फार वाईट वाटले. कारण जर बाबा आले नाही तर माझ्या मुलाचे दुःख कसे दूर होईल. अशी शंका मनात येत होती. नंतर बाबांनी सांगितल्याप्रमाणे विनंती केली व सेवकाला सोबत घेऊन दवाखान्यात गेलो. रात्र जास्त झाल्यामुळे वार्डात येऊ देत नव्हते. परंतु परमेश्वराची घडामोडी अशी की त्याच वेळी मोठ्या डॉक्टरांनी या मुलाला एका टेबलावर आणून ठेवले. आणि त्या मुलाच्या तोंडात दोन बोटे घातली. त्याचवेळेस मुलगा रडला. हे दृश्य आम्ही बाहेरुन पाहत होतो. त्या मुलाचे रडणे ऐकल्यावर मला फार आनंद झाला. तेव्हा मी भगवान बाबा हनुमानजींचे नामस्मरण केले व म्हणालो ही आपली महान कृपा आहे. ह्यया कृपेला मी जीवनात विसरणार नाही. त्यानंतर आम्ही बाबांकडे जाऊन सर्व हकीकत सांगितली आणि ह्या मार्गावर येण्याचा निश्चय केला हा मार्ग स्वीकारल्यावर आम्ही सुख–समाधानाने जीवन जगत आहोत.

* * * * *